पुण्य नगरी

# तंत्रज्ञानामुळे स्मार्ट वर्कची गरज : आजरी

**गडहिंग्लज :** तंत्रज्ञानामुळे अनेक प्रगत राष्ट्रांमध्ये कमी प्रमाणात मनुष्यबळाचा वापर होतो. आपल्याकडे ही अवस्था पुढील काळात निर्माण होणार आहे. त्यामुळे कामातील कौशल्ये आत्मसात करून स्मार्ट वर्क करण्याची गरज आहे, असे मत निवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी बाबासाहेब आजरी यांनी व्यक्त केले.

येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा प्रधान कार्यालय गडहिंग्लज येथे आयोजित कर्मचारी सॉफ्टवेअर प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. स्वस्या सोल्युशन कंपनीचे कार्यकारी संचालक पी. आर. शिंगटे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.




**गडहिंग्लज : कर्मचारी प्रशिक्षण वर्गामध्ये मार्गदर्शन करताना बाबासाहेब आजरी. उपस्थित एम. एल. चौगुले, पी. आर. शिंगटे, डी. के. मायदेव व अन्य.**

पीओसीट सॉफ्टवेअर कंपनीचे अधिकारी रामदास पाटील, किशोर तनपुरे, जीवन कुंभार, सिस्टीम मॅनेजर विजय बुगडे यांनी नवीन सॉफ्टवेअरविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अशोक सुळकुडे, सुनीलदत्त जाधव, सुनील बावन्नावर, एकनाथ केसरकर आदी उपस्थित होते. यावेळी सीईओ डी. के. मायदेव यांनी प्रास्ताविक केले. बाबासाहेब मार्तंड, श्वेता टोनेण्णावर यांनी सूत्रसंचालन केले. विजय बुगडे यांनी आभार मानले.

Kolhapur Edition Edition
Aug 26, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com